*Annexure XIC (8), (Vide Article - 11.06)*

महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत[ नियमन अधिनियम १९६४-अवैध तोडीवर प्रभावी कार्यवाही

महाराष्ट्र शासन
महसूल व वन विभाग
परिपत्रक क्रमांक वृतोनि १०८७/३२९८/ग-७
मंत्रालय, मुंबई-४०००३२
दिनांक:- १९ फेब्रुवारी १९८८.

परिपत्रक:-

राज्यामध्ये होत असलेल्या वृक्ष तोडीबाबत सर्वत्र बरीचशी गंभीरपणे चर्चा चालू असते. याची सर्वांनाच पुरेशी कल्पना असल्याने त्याबाबत विशेष स्पष्टीकरण येथे देण्याची आवश्यकता नाही. राज्यामध्ये महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत[ नियमन] अधिनियम १९६५ हा एक महत्वाचा कायदा अस्तित्वात आहे. सदरहू अधिनियमातील कलम ३ नुसार विनिर्दिष्ट झाडांची तोड करण्यापूर्वी महसूल विभागातील सक्षम अधिकाऱ्यांची परवानगी घेणे आवश्यक असते. तसेच उक्त अधिकनियमाच्या कलम ४ नुसार विनापरवाना झाडेतोड प्रकरणी जबाबदार व्यक्तिस चौकशीनंतर जास्तीत जास्त एक हजार रुपये दंड करण्याची तरतूद आहे. त्याशिवाय वरील दंडशिक्षे व्यतिरिक्त, विना परवाना तोडलेली झाडे महसूल अधिकारी जप्त करु शकतात. यावरुन एक गोष्ट स्पष्ट होईल की याबाबत महसूल अधिकाऱ्यांना दोन सुस्पष्ट व पुरेसे अधिकार आहेत. ते म्हणजे गुन्हेगारास जास्तीत जास्त एक हजार रुपयांपर्यंत दंड बसविणे आणि दुसरा म्हणजे गुन्हेगारांकडून विना परवाना तोडलेल्या झाडांचा माल जप्त करणे.

२. उक्त कायद्यात अशा प्रकारच्या स्पष्ट तरतुदी असताना सुध्दा शासनाच्या असे निदर्शनास आणण्यात आले आहे की, बहुतांशी महसूल अधिकारी विना परवाना झाडेतोड प्रकरणांमध्ये रुपये ५०/- ते ५००/- दंडा पर्यन्त किरकोळ शिक्षा देवून [जी एक हजार रुपयापेक्षा कमी आहे] व सौम्य दृष्टीकोन ठेवून गुन्हेगारास मोकळे सोडतात. परिणामत: गुन्हेगारांच्या प्रवृत्तीस पायबंद बसत नाही. म्हणून या परिपत्रकाद्वारे सर्व अधिकारी यांना अशी विनंती करण्यात येत आहे की, महाराष्ट्र झाडे तोडण्याबाबत [ नियमन] अधिनियमाखाली विना परवाना झाडे तोड प्रकरणांमध्ये चौकशीअंती ज्या ज्या वेळी अवैध वृक्षतोड झाल्याचे सिध्द होईल त्या त्या वेळी प्रकरणाचे गुणवत्तेनुसार गुन्हेगारास जास्तीत जास्त दंडाची शिक्षा देण्या बरोबरच आवश्यकतेनुसार विना परवाना तोडलेल्या झाडांचा सर्व माल राज्य शासनाकडे समपहरण [जप्त] करण्याचे आदेश सर्व सक्षम अधिकाऱ्यांना देण्यात यावेत. तसेच, सर्व विभागीय आयुक्तांना व जिल्हाधिकाऱ्यांना अशी विनंती आहे की, त्यांनी अशा प्रकरणातील सर्व सक्षम अधिकाऱ्यांना उक्त अधिनियमातील त्यांना असलेल्या अधिकाराविषयी स्पष्ट जाणीव करुन द्यावी व सौम्य धोरण न ठेवता सदर शक्तींचा त्यांनी पुरेपूर व निग्रहपूर्वक वापर करावा अशा त्यांना सविस्तर सूचना द्याव्यात. तसेच उक्त कायद्याच्या अस्तित्वाची सर्वांना जाणीव राहून

कृ. मा. पृ.

अनिर्बंध वृक्षतोडीस आळा घालण्यासारखी होईल आणि राष्ट्र विघातक वृत्तीमुळे पर्यायाने राज्याचे होणारे संभाव्य नुकसान टाळता येईल.

सर्व वरिष्ठ अधिकाऱ्यांनी कृपया याबाबत अधिक जागरूक राहून याबाबत गंभीरपणे व तत्परतेने कारवाई करावी अशी शासनाची अपेक्षा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ चं. र. क्षिप्रदास ]
उपसचिव,
महसूल व वन विभाग.

प्रति,

सर्व विभागीय आयुक्त

सर्व जिल्हाधिकारी

प्रधान मुख्य वनसंरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर.

मुख्य वनसंरक्षक [संधारण] महाराष्ट्र राज्य, नागपूर

सर्व वनसंरक्षक [ प्रादेशिक]

सर्व विभागीय वन अधिकारी

सर्व कार्यासने, महसूल व वन विभाग

प्रत ग-७ व फ-६ [ निवड नस्ती] महसूल व वन विभाग.